# वसई विरार शहर महानगरपालिका

## वैद्यकीय आरोग्य विभाग

### थेट मुलाखती (Walk in Interview)

**विषय :-** कोरोना विषाणू (कोविड-१९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी वसई विरार शहर महानगरपालिकेत वैद्यकीय अधिकारी या पदासाठी करार पद्धतीने ठोक मानधन तत्त्वावर सेवा घेणे.

कोरोना विषाणू (कोविड-१९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी उपाययोजना करण्याकरिता वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात कोविड-१९ रुग्णालयात वैद्यकीय अधिकारी या पदावर करार पद्धतीवर काम करण्यासाठी इच्छुक उमेदवारांनी थेट मुलाखती (Walk in Interview) कामी वसई विरार शहर महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभाग, मुख्य कार्यालय येथे त्यांचे अर्ज संपूर्ण तपशिलासह त्वरित सादर करावेत.

| अ.क्र. | पदनाम | पद संख्या | शैक्षणिक पात्रता | मासिक एकत्रित मानधन |
|---|---|---|---|---|
| १ | वैद्यकीय अधिकारी (भिषक) | आवश्यकतेनुसार | मान्यताप्राप्त विद्यापीठाची एम.बी.बी.एस., एम.डी. (मेडिसीन) किंवा समकक्ष पदवी आणि व महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलकडील नोंदणी प्रमाणपत्र. | रु.५७,८००/- |
| २ | वैद्यकीय अधिकारी (भूलतज्ज्ञ) | आवश्यकतेनुसार | मान्यताप्राप्त विद्यापीठाची एम.डी. (ॲनास्थेशिया) किंवा समकक्ष पदवी आणि व महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलकडील नोंदणी प्रमाणपत्र. | रु.५७,८००/- |
| ३ | वैद्यकीय अधिकारी (एम.बी.बी.एस.) | २० | मान्यताप्राप्त विद्यापीठाची एम.बी.बी.एस. पदवी आवश्यक व संबंधित मेडिकल कौन्सिलची नोंदणी आवश्यक तसेच ३ वर्षांचा आय.सी.यू. विभागाचा अनुभव आवश्यक. | रु.५४,७००/- |
| ४ | वैद्यकीय अधिकारी (बी.ए.एम.एस.) | २० | मान्यताप्राप्त विद्यापीठाची बी.ए.एम.एस. पदवी आवश्यक व इंडियन मेडिकल कौन्सिलकडील नोंदणी प्रमाणपत्र. तसेच ३ वर्षांचा आय.सी.यू. विभागाचा अनुभव आवश्यक. | रु.३८,६००/- |
| ५ | वैद्यकीय अधिकारी (बी.एच.एम.एस.) | २० | मान्यताप्राप्त विद्यापीठाची बी.एच.एम.एस. पदवी आवश्यक व महाराष्ट्र कौन्सिल ऑफ होमिओपॅथीकडील नोंदणी प्रमाणपत्र. तसेच ३ वर्षांचा आय.सी.यू. विभागाचा अनुभव आवश्यक. | रु.३५,०००/- |

**अर्ज करण्याची पद्धत :-**

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभाग, चौथा मजला, प्रभाग समिती-सी, बहुउद्देशीय इमारत, विरार (पूर्व) येथे संपूर्ण तपशिलासह दि. १३.१०.२०२० ते दि. ३०.११.२०२० पर्यंत सकाळी ११ वाजता या वेळेत अर्ज सादर करावा. सार्वजनिक सुट्टीचा दिवस वगळून अर्जाचा नमुना **www.vvcmc.in** या संकेतस्थळावर प्रसिद्ध केलेला आहे. अर्जासोबत आवश्यक ती कागदपत्रे सादर करण्यात यावी. सदर थेट मुलाखतीसंबंधित सर्व माहिती महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध केलेली आहे. अन्य अटी व शर्ती उपरोक्त संकेतस्थळावर पाहावयास भेटतील.

सही/-

शिक्का

**(डॉ. विजयकुमार द्वासे)**
उपायुक्त (वैद्यकीय आरोग्य)
वसई विरार शहर महानगरपालिका

जा.क्र.वविशम/वैआवि/११९२/२०२०
दिनांक : १२.१०.२०२०